**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय लोकशाही आघाडी देशाच्या प्रगतीसाठी आणि गरिबांच्या सशक्तीकरणासाठी वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- युद्धाच्या नवनवीन प्रकारांमुळे संरक्षण क्षेत्रात नवी आव्हानं उभी राहत असल्यानं युवक आणि खासगी उद्योगाने नवोन्मेषात पुढाकार घ्यावा, असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन

- जम्मू-काश्मीर केंद्र शासित प्रदेशातल्या नवीन मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी

- बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी प्रमुख आरोपी शिवकुमार गौतम याच्यासह तिघांविरोधात लुक आऊट नोटीस

**आणि**

- हमासचा प्रमुख याह्या सिनवार इस्राईलने गाझा पट्टीत केलेल्या हल्ल्यात ठार

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी-एनडीए देशाच्या प्रगतीसाठी आणि गरिबांच्या सशक्तीकरणासाठी वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. चंडीगढ इथं एनडीएच्या प्रणित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत सुशासन आणि नागरिकांना अधिक सेवासुविधा पुरवत त्यांचं राहणीमान अधिक चांगलं कसं करता येईल, यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरून दिली.

या बैठकीत भाजपचे अध्यक्ष जे पी नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. याच बैठकीत संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यावरही चर्चा झाली. या बैठकीला १७ राज्यांचे मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी कर्मयोगी सप्ताह या राष्ट्रीय शिक्षण सप्ताहाचं उद्घाटन दिल्लीतल्या डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सभागृहात करणार आहेत. या राष्ट्रीय शिक्षण सप्ताहा दरम्यान विविध मंत्रालये आणि संस्था यांच्याद्वारे परिसंवाद आणि कार्यशाळांचं आयोजन करण्यात येणार आहे.

<><><><><>

युद्धाच्या नवनवीन प्रकारांमुळे संरक्षण क्षेत्रात नवी आव्हानं उभी राहत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेतर्फे आयोजित डेअर टू ड्रीम फाईव्ह पॉईंट झीरो या नवोन्मेष स्पर्धेचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ड्रोन, सायबर युद्ध, जैविक शस्त्र, असे नवनवीन मार्ग युद्धासाठी वापरले जातात, अंतराळातली संरक्षण व्यवस्था हे देखील नवीन आव्हान असल्याचं ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर युवकांनी आणि खासगी क्षेत्रानं संरक्षण क्षेत्रात पुढाकार घ्यावा असं आवाहन त्यांनी केलं. संरक्षण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान यावं यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाल. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचं त्यांनी कौतुक केलं.

<><><><><>

जम्मू-काश्मीर केंद्र शासित प्रदेशातल्या नवीन सरकारने आज मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर केलं. त्यानुसार, उपमुख्यमंत्री सुरिंदर कुमार चौधरी हे सार्वजनिक बांधकाम, उद्योग आणि वाणिज्य, खाणकाम, कामगार आणि रोजगार, कौशल्य विकास मंत्री असतील. तर सकिना मसूद यांच्याकडे आरोग्य आणि

वैद्यकीय शिक्षण, शालेय तसंच उच्च शिक्षण आणि समाजकल्याण विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे. जलशक्ती, वन संधारण आणि पर्यावरण आणि आदिवासी व्यवहार विभाग जावेद अहमद राणा यांच्यावर सोपवण्यात आला आहे. कृषी उत्पादन, ग्रामीण विकास आणि पंचायती राज, सहकार विभागाची जबाबदारी जावेद अहमद दार यांच्याकडे असेल. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार, वाहतूक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, युवा आणि क्रीडा तसंच एआरआय आणि प्रशिक्षण मंत्री म्हणून सतीश शर्मा काम पाहतील. याशिवाय ज्या विभागांचं वाटप मंत्र्यांना झालेलं नाही ते सर्व विभाग किंवा विषय हे मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित असतील, असे आदेश नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभवाची भीती वाटत असल्यानं मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. या आणि इतर विषयांमध्ये निवडणूक आयोगानं लक्ष घालून कारवाई करावी, या मागणीसाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड आणि इतर महाविकास आघाडीच्या इतर नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. लोकसभा निवडणुकीत ज्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जास्त मतं मिळाली, तिथं मतदार याद्यांमध्ये फेरफार करून नावं कमी करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं केला. तसंच सात क्रमांकाच्या अर्जाद्वारे मतदार नोंदणी करण्याची

प्रक्रियाच संशयास्पद असून त्याबद्दल श्वेतपत्रिका काढण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना हटवायला निवडणूक आयोगानं नकार दिल्यावरूनही त्यांनी आयोगावर टीका केली. सरकारच्या योजनादूत योजनेद्वारे जनतेच्या पैशाची उधळपट्टी होत असून ही योजना रद्द करावी, अशी मागणीही निवडणूक अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांसाठी घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं पार पडावी, ही मागणी करून, निवडणुकीच्या या काळात नागरिकांनी जागरूक राहावं, यादीतलं आपलं नाव वारंवार तपासून घ्यावं, असं आवाहन नाना पटोले यांनी केलं.

दरम्यान,विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी नाव मतदार यादीत असणं आवश्यक आहे. ज्या पात्र मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत अजूनही समाविष्ट केलेलं नाही, त्यांना उद्यापर्यंत म्हणजे १९ ऑक्टोबरपर्यंत मतदार यादीत आपलं नाव नोंदवण्याची संधी आहे. असं आवाहन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं.

**<><><><><>**

निवडणूक काळात कुठंही गैरप्रकार घडू नयेत यासाठी प्रशासन सज्ज आहे. रायगडमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागानं केलेल्या कारवाईत एकूण २ लाख ७१ हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. २५ ऑक्टोबरपर्यंत यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २८ तारखेला अर्जांची छाननी होईल आणि ३० ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघांमधे १३ नोव्हेंबर रोजी

मतदान होणार आहे. राज्यात सर्वच राजकीय आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबतच्या चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. राज्यात भाजपा, एजेएसयू, संयुक्त जनता दल आणि चिराग पासवान यांच्या एलजीपी पक्षांनी आघाडी केली असून झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी पक्षासोबत निवडणूक लढवणार आहे. दरम्यान राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप जाहीर झालं असून भाजपा -६८- जागा लढवणार आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी प्रमुख आरोपी शिवकुमार गौतम याच्यासह तिघांविरोधात मुंबई पोलिसांनी लुक आऊट नोटीस जारी केली आहे. यात शुभम लोणकर आणि मोहम्मद जिशान अख्तर यांचा समावेश आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी मुंबई पोलिसांच्या गुन्हे विभागाची पथकं देशाच्या विविध भागात रवाना झाली आहेत.

दरम्यान,या प्रकरणातला एक आरोपी गुरमेल याच्या हरियाणातील कथैल गावातही मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे अधिकारी चौकशीसाठी गेले आहेत. तिथं त्याच्या मित्रांची सखोल चौकशी केली जात आहे.

<><><><><>

इस्त्राईलने गाझा पट्टीत केलेल्या हल्ल्यात हमासचा प्रमुख याह्या सिनवार मारला गेला. सिनवार ज्या इमारतीमध्ये लपला होता, त्यावर इस्त्राईलनं बॉम्ब हल्ला केला.मात्र, हमासनं सिनवारच्या मृत्यूला अद्याप दुजोरा दिलेला नाही. सिनवर हा हमासच्या राजनैतिक विभागाचा प्रमुख होता. तसंच तो इस्माइल हानिए याचा उत्तराधिकारी होता.

<><><><><>

आसाममधल्या तामूलपुर या छोट्या गावातल्या खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रातल्या सहा तलवारपटूंची ६८ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुढच्या महिन्यात जम्मू काश्मीरमध्ये या स्पर्धा होणार आहेत.

**<><><><><>**

भारत विरुद्ध न्यूझीलंड बंगळुरु कसोटी क्रिकेट पहिल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी आज न्यूझीलंडचा पहिला डाव ४०२ धावांवर संपला. पहिल्या डावात न्यूझीलंडला ३५६ धावांची आघाडी मिळाली आहे. रचिन रवींद्रच्या शतकी खेळीच्या बळावर न्यूझीलंडला ही धावसंख्या उभारता आली. भारताचा दुसरा डाव सुरु झाला असून शेवटची बातमी मिळाली तोपर्यंत भारताच्या बिनबाद ४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या पी. व्ही. सिंधू हिची लढत इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया तुनजुंग हिच्याशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना दुपारी ४ वाजून १० मिनिटांनी सुरू होईल.

काल या स्पर्धेच्या १६व्या फेरीत सिंधूने चीनच्या हान यू हिचा १८-२१, २१-१२, २१-१६ असा पराभव केला होता.

**//<><><><><>//**